# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०५/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## वाहनासह एकुण २०,१८,००० /— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २२/०५/२०२४ चे ०७.१५ वा. ते ०८.१५ वा. दरम्यान पोस्टे रामटेक येथील स्टाफ पोस्टे रामटेक परिसरात पेट्रोलिंग करित असता गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, नगरधन येथे ट्रक द्वारे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून स्टाफने नगरधन येथे नाकाबंदी करून रेती वाहतुक करणारा १० चक्का ट्रक क्र. एम. एच—४०/ए.के.—६५३९ चा चालक **आरोपी नामे— आरिफ वल्द अहमद शेख वय ३९ वर्ष, रा. बाबा ताज मज्जीद जवळ बहादुरा रोड खरबी, नागपूर** यानी आपल्या ताब्यातील वाहनामध्ये विनापरवाना (रॉयल्टी) रेतीची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून १० चक्का ट्रक क्र. एम. एच—४०/ए.के.—६५३९ किंमती २०,००,०००/— रू आणी ६ ब्रास रेती प्रत्येकी ३००० रू प्रमाणे १८,००० रू. एकुण २०,१८,०००/— रू मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन रामटेक येथे **आरोपी चालक नामे— १) आरिफ वल्द अहमद शेख वय ३९ वर्ष, रा. बाबा ताज मज्जीद जवळ बहादुरा रोड खरबी, नागपूर २) मालक वहीद जमालजुद्दीन अन्सारी वय २० वर्ष, रा. खरबी नागपुर** याचेविरूद्ध कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक **येथील ठाणेदार** प्रशांत काळे, पोउपनि श्रीकांत लांजेवार, पोहवा अमोल इंगोले, पोना प्रफुल रंधई, मंगेश सोनटक्के, अनिल सपाटे, पोशि सचिन गेडाम, शरद गिते, धिरज खंते यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर